# अधिवेशनाचे निमित्ताने एक संवाद....

नमस्कार मंडळी ! फिली अधिवेशनाचे सूप वाजले. पाहुणेमंडळी "शिकागोला जमले तर भेटू या" असा सावध निरोप घेत होती. एकंदरीत बृहन महाराष्ट्र मंडळाचे या वर्षाचे फिलाडेल्फीयांत झालेले अधिवेशन बरेच गाजले.जवळजवळ पांच हजार मराठी मंडळीनी उपस्थीत राहून गर्दीचा उच्चांक गाठला.भाऊगर्दीत हरवलेला मराठी माणूस, एकादा जुना मित्र अचानक भेटल्यामुळे आनंदीत होत होता. पाहिजे असलेली "डिश" संपली म्हणून त्रागा करणारे जेवणाच्या रांगेत उभे असलेले पाहुणे, आणि काही टुकार कार्यक्रमामुळे स्वतःची खुर्ची सोडून पळापळ आणि धांवपळ करणारे ज्येष्ठ नागरिक गर्दीतून वाट काढीत,कार्यक्रमाच्या हॉलमध्ये खुर्च्याच नसलेल्या पाहून, तोंडातलेतोंडात "झक् मारली आणि इथं आलो' म्हणून रागाने दुसरीकडे धांव घेत होते. गर्दीत हरवलेल्या लहानमुलासारखे इतस्ततः, थव्याथव्याने फिरणारे भांबावलेले लोक पाहिले म्हणजे "कुंभमेळयाची"आठवण येत होती.इतकी अव्यवस्था आणि गोंधळ या अधिवेशनांत अनुभवायला येईल याची हजर रहाणाऱ्यांना कल्पना नसावी. अधिवेशन "कसे असावे" या पेक्षा ते "कसे नसावे" याची सविस्तर चर्चा, महाराष्ट्रांतील आणि इकडील बऱ्याच वर्तमानपत्रांत, मासिकांत आणि वेबसाईटस् वर झाली आहे.

हा आवाज पुण्याच्या "सकाळ" पासून ते थेट न्युजर्सीच्या "अंतराळ" पर्यंत पोचला. "अहो रूपम् अहो ध्वनीम्" म्हणून पाठ थोपटून घेणाऱ्यां संयोजकांना, शिमग्याल्या "धुळवडीचा" अनुभव घ्यावा लागला. प्रांजलपणे केलेल्या घोडचुकांबद्दल दिलगिरी व्यक्त करण्याऐवजी उलट एका सेवाभावी कार्यकत्याने आपल्या मनोगतांत तुमच्या शहरातदेखील तुम्ही पुढेमागे असेच अधिवेशन करावे व मराठीची सेवा करावी असा मोलाचा सल्ला सर्वांना देण्याचा आगाऊपणा केलाय.ते वाचल्यानंतर या महाभागांचाच "अवतार" झालेला पहाण्याची चर्क्षुवै सत्यम् प्रचिती, अधिवेशनांत सर्वांना प्रत्यक्षांत लाभली होती हे आठवले.

डॉ. प्रकाश लोथ्यांच्या "भंरवश्याच्या म्हशीला..?" झालेल्या टोणग्याने ज्या लाथा मारल्या त्याला तोड नाही. "जसं घडलं तसं" सांगणाऱ्या मधुराबाई गोखल्यांनी व भाई कारखानीस-विजय शेरतुकडे- दादा प्रधानांनी आपापल्या लेखांत साकल्याने गुणदोषांची चर्चा केली व उपाय सुचविले. अरिझोनाचे विजय पाठारे यांनी अधिवेशनावर जी रास्त टीका केली त्याला रागाने उत्तर देताना एका अनभिज्ञ अरसिकाने, पाठारे यांच्या एका सुंदर कवितेचा अर्थ न कळून, त्यांना बिनदिक्कत "अश्लील" कवि म्हणून हेटाळले. या कवितेचा आणि अधिवेशनाचा अर्थाअर्थी काही एक संबंध नव्हता. शरद साठे आणि लंडनच्या कुमुद जोगळेकरांनी 'नीर क्षीर' न्यायाने अधिवेशनासंबधी आपले स्पष्ट विचार मांडून जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सविताबाई गोखल्यांच्या "पळा रे पळा" ने प्रेक्षकांची झालेली अभूतपूर्व पळापळतर वर्ण न केलीच पण परिणामी विक्रम गोखल्यां सारख्या मान्यवर नटाला जाहीरपणे मान खाली घालवी लागली. फ्लॉरिडामध्ये स्थाईक झालेल्या श्री देवदत्त बेन्द्रे यांनी कार्यकारी समितीला एक खलिता पाठवून जी नापसंती व्यक्त केली आहे त्याचा गांभीर्याने शिकागोची कमिटी विचार करेल ही आमची अपेक्षा आहे. त्यांच्या मते बाहेरून अगत्याने बोलावलेल्या या कलाकारांची फिलाडेल्फीयाच्या मंडळाने, BMM कामिटीच्या वतीने जाहीरपणे दिलगिरी व्यक्त करावी.(तांत्रिकदृष्टया BMM Committee आता बरखास्त झालेली आहे.)

या सगळया सकारण टीकेला सकाळमध्ये अवास्तव उत्तर देण्याचा एका महोदयांनी केविलवाणा प्रयत्न केला केला. परंतु त्याचा परिणाम आगीत तेल ओतण्या सारखा झाला.आग तर विझली नाहीच पण संयोजकांना 'न भुतो न भविष्यती' अशी जनतेकडून सकाळमध्ये मुक्ताफळे ऐकावी लागली.

या कार्यकर्त्यांनी हे लक्षांत घ्यायला पाहिजे होते की टीका करणारे सगळे विघ्नसंतोषी वैरी नसतात. अमेरिकेत येऊन स्थाईक झालेला हा मराठी समाज चाळीस वर्षांपासूनचा आहे आणि अनेक मराठी अमराठी संस्थामधून काम केलेली ही अनुभवी माणसे आहेत. ज्या प्रमाणे 'विद्या विनयेन शोभते' त्याप्रमाणेच सामाजिक कार्यकर्त्याने कोणत्याही परिस्थीतींत प्रथम हात जोडून स्वागताला हजर असले पाहिजे. टीकाकारांनी दोष दाखविले म्हणून हातात गदा घेऊन, दुर्योधनाचा आव आणण्याचे कारण नाही.

ही ह्या सविस्तर लेखाची पार्श्वभूमी. एवढा विस्तृत उपन्यास करण्याचे कारण येवढेच की निःस्वार्थी समाजकार्यकर्त्यांत जनादेश मानण्याचा समंजसपणा असावा. काही स्वयंभू कार्य कर्त्यांना टीका सहन होत नाही. त्याचा परिणाम म्हणूनच की काय टीकाकारांना 'छिद्रान्वेशी आणि ग्रम्पी' म्हणुन संबोधण्याचा अगोचरपणा करण्याचे धाडस करावे लागले. त्यांना एवढेच सांगावेसे वाटते की ज्यांच्या मार्फत लाखो डॉलर्सचा निधी उभा केला जातो अशा साठ टक्के "ग्रम्पी आजोबांना", इतरांबरोबर काही भिकार कार्यक्रमामुळे सभागृह सोडावे लागले हे सत्य नाकारता येणारे आहे का? आपणच 'सर्वज्ञ' आहोत हा अहंकार या 'सेवाभावी कार्यकर्त्यांनी' सोडावा अशी त्यांना कळकळीची विनंती करून, उपस्थीत पण नाखूष असलेल्या जनतेच्या रास्त अपेक्षा आपल्यापर्यंत पोहोचवण्याचाच फक्त  आमचा हेतू आहे हे लक्षांत घ्यावे.

१ **सभागृह** ः

(i)मुख्य सभागृह मध्यवर्ती असावे आणि रेल्वे आणि बसने जाता येण्यासारखे असावे. या सभागृहाची मर्यादा फक्त ३५00 उपस्थिताना बसता येण्यापुरतीच असावी. मुख्य सभागृहाला लागून असणाऱ्या दोन उपसभागृहांची बसण्याची मर्यादा १५00 ते २000उपस्थितांना बसण्या इतकी असावी.'आम्ही पुढचे अधिवेशन दहा हजार लोकांचे भरवणार आहोत" अशा वल्गना करूं नका. अधिवेशनाचा कार्यक्रम शिस्तबध्द असावा. नियोजीत जागांचे (Halls) आणि कार्य क्रमांचे सारखे बदल करू नये. यामळें प्रचंड गोंधळ निर्माण होतो.

ii) **मोटारी ठेवण्याची जागा** (Parking) सभागृहाच्या शेजारी असावी.

**iii) कामगार युनियन** ःकोणत्याही सभागृहाची जागा मुक्रर करण्याआधी युनियन बरोबर बोलणी करावी. आपल्या कार्यक्रमांचे वेळापत्रक आणि लागणाऱ्या सोई-सुविधा यांची खुलासेवार चर्चा करून व त्या सर्व अटी मान्य करवून लिहून घ्याव्यात.

**iv) प्रकाश योजना, साऊंड सिस्टीम, व्हिडीयो चित्रीकरण** ः या सर्व सुविधांची माहिती करून घ्यावी. तसेच मुख्य सभागृहांत बाहेरचा सरकता पडदा (Main Curtain) आहे याची खात्री करून घ्यावी.

**v) बसण्याच्या जागांचे वाटप** ः निमंत्रीत पाहुणे, व्हि.आय.पीज, देणगीदार, जाहिरातदार, पत्रकार आणि कमेटीचे सभासद यांच्या राखीव जागांची व्यवस्था करणे. वेळप्रसंगी कमेटीच्या सभासदांच्या राखीव जागा, सामंजस्याने कमी करण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार नियोजन मंडळाकडे असेल.

**vi) स्वयंसेवक** ः स्वयंसेवक हा अधिवेशनाचा अविभाज्य घटक आहे."Volunteer Project Manager" हा कार्यक्रम, आयोजन व कार्यकारी समिती यामधील महत्वाचा दुवा आहे. शेवटच्या क्षणा पर्यंत High Command ने कार्यक्रम स्थळ सांगण्यांत दिरंगाई किंवा बेफिकिरी केली तर हीच मंडळी आयेजकांच्या रोषास व जनता जनार्दनाच्या नाराजीचे लक्ष होतात. मृदुंगासारख्या दोन्ही बाजूनी थपडा मिळाल्यानंतर शिकागो अधिवेशनाला स्वयंसेवक, मदतीचा हात पुढे करतील कां याचा नवीन कमिटीने विचार करावा. एकतंत्री कारभारामुळे

अधिवेशनाचा कसा बोजवारा उडतो याचे प्रात्यक्षिक मागच्या अधिवेशनांत अनुभवायला मिळाले. सत्तेचे विकेन्द्रीकरण आणि प्रामाणिक बांधिलकी यांच्या भागिदारीनेच हा गुंता सुटू शकतो.

**कार्यक्रम :**

गट १ : ज्येष्ठ नागरीक आणि दुसरी पिढीसाठी कार्यक्रम
गट २ : तरूण पिढीसाठी कार्यक्रम
गट ३ : मुलांसाठी कार्यक्रम
गट ४ : शिशुवर्गासाठी पाळणाग्रह (Baby sittings with play station)

1. **गट १ : ज्येष्ठ नागरीक आणि दुसरी पिढी :**

अ. औद्योगीक वैज्ञानीक आणि व्यावसाईक संमेलन

ब ज्येष्ठ नागरिकांसाठी परिसंवाद:चर्चासत्र - प्रकृती स्वास्थ आणि आरोग्य विषयक, मृत्युपत्र- .प्रोबेट- हयात ट्रस्ट- अंत्यव्यवस्था या बद्दल माहिती ( Wills-Probate-Living Trust-Cremation)

क. वरील विषया व्यतिरिक्त संगीत साहित्य आणि सामाजिक विषयांवर नियोजीत भाषणे अथवा चर्चासत्र.

२. **करमणुकीचे कार्यक्रम :**

**संगीत** :शास्त्रीय, समशास्त्रीय,(Semi Classical) प्रचलीत रूढ पध्दतीचे (Contemporary), तरूण कलाकारांचे संगीताचे कार्यक्रम असावेत. **त्यांत स्थानिक कलाकारांना प्राधान्य दिले गेले पाहिजे व त्यांना योग्य मानधन देणे आवश्यक आहे. कित्येकवेळा गाणाऱ्या कलावंताला साथीसठी बरोबर काही अन्य कलावंत आणावे लागतात. येथे तबला, पेटी, व्हायोलिन वाजवणारे निष्णात कलाकार उपलब्ध आहेत. अश्या साथीदारांची पर्यायी व्यवस्था समितीने करणे आवश्यक आहे.**

**भारतांतातून एकापेक्षां जास्त गाणारे कलाकार आणू नयेत.**

**नाटक / संगीतिका / लावणी / पोवाडे /नृत्य :**
महाराष्ट्रातून चांगल्या अभिरूचीचे आणि प्रत्यक्ष पाहून निवडलेले फक्त एक नाटक आणावे.

**संगीतिका नृत्य** : स्थानिक कलाकारांचे प्रत्यक्ष पाहून निवडलेले कार्यक्रम असावेत. **बाहेरून लावणीचा कार्यक्रम आणू नये.**

**एकांकिका** : स्थानिक व कॅनडांतील कलाकारांनी बसवलेल्या चार ते सहा निवडलेल्या एकांकिका सादर कराव्यात. त्यांतील निम्म्या एकांकिका स्थानिक लेखकांनी लिहीलेल्या असाव्यात व निम्म्या भारतांतील सामाजिक व्यथा दिग्दर्शित करणाऱ्या महाराष्ट्रांतील लेखकांनी लिहिलेल्या असाव्यात. भारतांतून एकांकिका किंवा हास्यपंचमी सारखे कार्यक्रम आणू नयेत. रंगभूमी (stage) साधे सुटसुटीत असावे व सर्व एकांकिका त्याच एका स्टेजवर सादर कराव्यात. मागे फक्त एक पडदा (Backdrop) ठेवावा. “सर्वोत्तम” एकांकिका निवडण्याचे काम स्थानिक परीक्षकांकडे द्यावे आणि त्यांना योग्य मानधन द्यावे.

**कविता वाचन** : स्थानिक कविंचा कविता वाचनाचा कार्यक्रम ठेवावा. साधारण ८ मान्यवर कवि निवडून प्रत्येकाची एक कविता सादर करण्याची संधी द्यावी. अशी निवडलेली कविता सुरेल आवाजांत गाऊन दाखविण्यसाठी पाहिजे असल्यास अन्य व्यक्तिची मदत घ्यावी. त्या मुळे कविता वाचनांत रटाळपणा (Boaring) येणार नाही.

**अधिवेशन आणि मराठी भाषा** : अमेरिकेंतील मराठी भाषिकांचे हे अधिवेशन असल्या कारणाने येथील मराठी समाजाने, आपली भाषा आणि साहित्य कसे जपले आहे अथवा वर्धीत केले आहे याची जाण अनिवासियांना असणे आवश्यक आहे. तसं झालं नाहीतर महाराष्ट्रांतील जनता आपल्या मराठीकडे अथवा साहित्याकडे फक्त कौतुकाने दृष्टी टाकेल. या कारणास्तव येथील साहित्यिकांनी मराठी वाङमयांत जी अमोल भर घातली आहे त्याची अभिमानाने जाण ठेऊन, अश्या साहित्यिकांची व त्यांच्या लिखाणाची अधिवेशनाच्या कार्यकारिणीने दखल (recognition) घेणे आवश्यक आहे.

**धार्मिक विषयावरील कार्यक्रम** : भजन, कीर्तन इत्यादी कार्यक्रम निवडल्यास एक तासापेक्षा जास्त वेळाचे असू नयेत.

त**रूणपिढीसाठी कार्यक्रम** :

हे कार्यक्रम अमेरिकेत वाढलेल्यातरूणपिढी साठी असल्या कारणाने कार्यक्रमांची बैठक, अमेरिकन मुलांना आवडणारी असावी. दर अधिवेशनांत फेटे बांधून, शिंग तुताऱ्या फुंकून, मिरवणूक काढण्याचे किंवा लेझीमच्या गदारोळांत आरोळया ठोकून शिमगा करण्याचे प्रयोजन नाही. अमेरिकन शाळांमधून अमेरिकन संगीत आणि वाद्ये शिकणारी अनेक मुलंमुली आहेत. अनेक शहरांत या मुलांचे चांगले वाद्यवृंद तयार आहेत. या तरूण पिढीला जर वारसा ठेवायचा असेल तर तो सद्‌गुणांचा, समतोल बुध्दीचा आणि सहुष्णतेचा असावा. या साठी उद्‌घाटनाचा (Opening Ceremony) कार्यक्रम येथील मुलांच्या अमेरिकन बॅंडने करावा.

**इतर कार्यक्रम** :हे कार्यक्रम तरूणमुलांनी निवडलेले असावेत. त्यांत नियोजकांनी अथवा कार्य कारिणीच्या सदस्यांनी हस्तक्षेप अगर ढवळाढवळ करू नये. यांत शास्त्रीय, समशास्त्रीय, पुरोगामी(Contemporary), एक पात्री अथवा समूह नृत्य (Solo or Group Dance) असे विभाग असावेत. या शिवाय मुलामुलींनी बसवलेले इंग्रजी प्रवेश व एकांकिका व एक पात्री विनोदी प्रवेश (Stand-Up Commedy) यांचा समावेश करावा.

अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी समारोपाचा कार्यक्रम तरूण पिढीतील कलाकारांनीच बसवलेला असावा. यांत प्रादेशीक नृत्य (Folk Dance)याचा अंतर्भाव करता येईल.

वरील कार्यक्रमा व्यतिरिक्त तरूणपिढीतील कार्यकर्त्यांनी सुचविलेले बदली कार्यक्रम (Stand By) तयार ठेवावेत.

कोणताही संगीताचा, एकांकिकेचा अथवा वाद्यवृंदाचा कार्यक्रम दीड तासा पेक्षा अधीक नसावा. तसेच नृत्य, समूह नृत्य अथवा एक पात्री प्रवेश एक तासापेक्षा जास्त वेळ घेणारा नसावा.

तरूण वर्गासाठी “स्नेहबंधन”, “वसंत पंचमी महोत्सव” आणि “फॅशन शो” सारखे कार्यक्रम नियोजित करावे. (स्वयंपाक करणे आणि साडी नेसणे अश्यासारखे हास्यास्पद कार्यक्रम टाळावेत.)

एकाचवेळी निरनिराळया सभागृहांत मनोरंजनाचे कार्यक्रम (parallel programs) ठेवणे कार्यकारी समितीच्या नियोजनाचा एक दोष म्हटला पाहिजे. तीन दिवसाच्या अधिवेशनासाठी निवडलेल्या कार्यक्रमांच्या संख्येवर जर बंधन घातले नाही तर सर्व कार्यक्रमांची खिचडी होते. पैशाचा अपव्यय होऊन प्रेक्षकांना चांगल्या कार्यक्रमांना मुकावे लागते. हे टाळणे अत्यंत आवश्यक आहे.

**राष्ट्र गीत** : फिलाडेल्फीयाच्या अधिवेशनांत फार मोठी चूक झाली ती म्हणजे अधिवेशनाची सुरवात अथवा समारोप कोणत्याही एका देशाच्या राष्ट्रगीताने झाली नाही. ही लाजीरवाणी गोष्ट फक्त फिलाडेल्फीयांतच घडू शकते. नवीन कार्यकारिणीने याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. "वंदे मातरम्" ने अधिवेशनाचा प्रारंभ करून अमेरिकन राष्ट्रगीताने समारोप करणे नुसते उचीतच नाही तर ते अवश्य आहे. 'एकताच्या' दिवाळी अंकात लता मंगरूळकर यांनी फिलाडेल्फीया आणि ४ जूलै यांचा अन्योन्य संबधाबद्दल जे लिहिले आहे ते विचार लक्षांत घेण्यासारखे आहेत.

**भोजन व्यवस्था :**
भोजन व्यवस्था तीन पध्दतीने होऊ शकते.
१. **वाढणीचे भोजन** ( Food served on Tables) २. **वाढून घेतलेले जेवण** (Buffet Food) ३. **स्टॉल्स मध्ये ठेवलेले, निरनिराळया पध्दतीचे जेवण.**

**१. वाढणीचे भोजन** : (Served Food) ही पध्दत जवळ जवळ बंद झाली आहे. लग्नमुंजीत होणाऱ्या, पुणेरी पेशवाई थाटाच्या पंगती आता बंद झाल्या आहेत. त्यामुळे हजारोंच्या संख्येने अधिवेशनांला येणाऱ्या पाहुण्यासाठी ही सोय करणे अशक्य आहे.

**२. वाढून घेतलेले जेवण**(Buffet Food) बऱ्याच अधिवेशनांत ही पध्दत स्विकारलेली होती. ही पध्दत जरी सोईस्कर असली तरी शिस्तीच्या अभावी बरेचवेळा गोंधळ होतो. जेवणासाठी नीट रांगा लावल्या जात नाहीत. वृध्द, अपंग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगळया रांगा असणे अत्यंत आवश्यक आहे. या पध्दतीत सर्वांत मोठा दोष म्हणजे अन्नाची हेळसांड आणि अन्न फुकट घालविण्याची वृत्ती. परिणामी काहीवेळा अन्न अपुरे पडून जेवणाऱ्यांची निराशा होते.

**३. स्टॉल्स मांडून निरनिराळया पध्दतीचे जेवण देणे:**
१९९५ सालच्या ह्युस्टन येथील अधिवेशनांत ही व्यवस्था होती. सर्व सभासदांना त्यांच्या प्रवेशपत्रिकेबरोबर जेवणाची कुपन्स् दिली जातात. ठरावीक किमतीची ही कुपन्स असल्यामुळे सभासदांना कोणत्याही स्टॅालवर जाऊन जेवण घेता येते. त्यांत भारतीय पध्दतीचे शाकाहारी अथवा मांसाहारी जेवण मिळू शकते. तसेच चायनीज, मेक्सीकन, फिलीपाईन्स अशा विदेशीय पध्दतीचे जेवण घेता येते. साबूदाण्याच्या खिचडीपासून मटणचॉप्स पर्यंतचे सवे प्रकार मिळू शकतात. याशिवाय वाढणीचा अथवा कमीजास्त अन्न घेण्याचा प्रश्न येत नाही अथवा अन्न फुकट घालविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

कार्यकारिणीने या तिन्ही सुविधांचा काळजीपूर्वक विचार करून निर्णय घ्यावा.

**अधिवेशनाचे अध्यक्षपद आणि प्रमुख वक्ते :**
आता पर्यंत होऊन गेलेल्या अधिवेशनांत प्रमुखतः महाराष्ट्रांतील राजकारण्यांची वर्णी लागत आलेली आहे. एकतामध्ये लता मंगळूरकर म्हणतात त्याप्रमाणे (फिलाडेल्फीयाच्या) अधिवेशनावर एक तऱ्हेचा राजकीय रंगाचा प्रभाव पडलेला होता हे सर्वांना कळून चुकले होते. बाहेरील राजकारण येथे आणण्याचे काहीएक कारण नाही. असा प्रयत्न घातकी आहे हे जाणकारांनी लक्षांत असू द्यावे.

यापुढे B.M.M. अधिवेशनाचे अध्यक्षपद मराठी राजकारण्यांना देण्याऐवजी अमेरिकेंतील मान्यवर आणि जनहिताची काळजी वहाणाऱ्या व्यक्तिला देण्याची प्रथा सुरू करायला हरकत नसवी. अमेरिकेत नोबेल प्राईज मिळालेल्या अशा काही व्यक्ती आहेत. त्यांत भूतपूर्वक अध्यक्ष श्री. जिमी कार्टर अथवा श्री अल् गोर यांचा समावेश करता येईल. या व्यक्ती जरी राजकारणांतल्या असल्या तरी त्यांचे निवृत्तीनंतरचे काम वैश्वीक बंधुभाव आणि जागतीक

प्रदूषण निवारण्यासाठी आणि हरीतक्रांती निर्माण करण्यासाठी चालले आहेत. अशा नावांचा विचार करणे कार्यकारिणीला अडचणीचे होऊ नये.म.गांधी कॉंग्रेस पक्षाचे जरी आधारस्तंभ होते तरी जग त्यांना राजकारणी म्हणून न ओळखतां विश्वाचे शांतीदूत म्हणूनच ओळखतात.

आतापर्यंत आमच्या सर्व अधिवेशनाचे अध्यक्षपद फक्त पुरूषांच्या वाटेला आलं आहे.सामाजिक क्षेत्रांत गोरगरीबांच्या शिक्षणासाठी, वैद्यकीय मदतीसाठी आणि स्त्रियांवर होणाऱ्या सामुदाईक अथवा वैयक्तीक अन्यायासठी झगडणाऱ्या स्त्रियांची महाराष्ट्रांत उणीव नाही.अशा भगिनी वर्गात पुण्याच्या विद्या बाळ आणि मुंबईच्या मृणालिनी गोरे या दोन स्त्रिया अग्रेसर आहेत. अश्यापैकी कोणत्याही एका स्त्रीला अधिवेशनाचे अध्यक्षपद देणे निश्चीतपणे बहुमानाचे आणि प्रचलीत परिस्थितीला अनुसरून होणारे आहे.

या शिवाय भारतीय वंशाचे श्री विक्रम पंडीत, पेप्सीच्या मिसेस नूरी, अथवा डॉक्टरीपेशांत असाधारण काम करणाऱ्या एकादया व्यक्तीला अध्यक्षपदासाठी पाचारण करणे विचारार्ह्य ठरेल. पर्यायाने संयुक्त राष्ट्रासंघातील भारतीय प्रतिनिधीला अधिवेशनाचे अध्यक्षपद देणे सुध्दा विचारांत घेण्यासारखे ठरेल.

**प्रमुख वक्ता** :प्रमुख वक्ता म्हणून धंदेवाईक राजकारणी अथवा मंत्री-खाासदाार निवडण्याऐवजी मराठींतील नामवंत साहित्यीक, संशोधक अथवा एकादा समाजधूरीण आमंत्रीत करणे सन्मानाचे ठरेल. मागील काही अधिवेशनांत कै. गंगाधरराव गाडगीळ, श्री रघुनाथराव मालशेकर, जयंत नारळीकर, डॉ. प्रकाश आमटे, श्री.अभय बंग या मान्यवर व्यक्तींना बोलावून कार्यकर्त्यांनी अधिवेशनाची शान वाढविली होती. ही प्रथा बंद करण्याची आवश्यकता नाही. तसेच उकृष्ट खेळाडू ,प्रसिध्द गायक, चित्रकार रंगभूमीवरील नट, वादक, निस्वार्थी लोकमान्य समाजसेवक किंवा तंत्रज्ञ अशा एकादया व्यक्तीला बोलावून त्यांची मुलाखत घेऊन त्यांचा बहुमान करावा. अशा प्रसंगी संस्थेच्या कार्यकर्त्यांची "हारतुरे परेड" बंद करावी.

**स्मरणिका** : अधिवेशनाची स्मरणिका सर्व मंडळांची "प्रातिनिधीक" असावी. त्यांत असणारे साहित्य- कथा, कविता आणि लेख वरच्या दर्जाचे असावे. लेखन साहित्य निवडण्यासाठी निरनिराळया विभागांतील जाणकारांचे "संपादक मंडळ" नियोजीत करावे. कोणत्याही एका शहराची अथवा भागाची (State) लिखाणावर मक्तेदारी असूं नये.लिखाण मध्यवर्ती सूत्राला धरून असावे व स्मरणिका कार्यकर्त्यांच्या वैयक्तीक प्रसिध्दीचे साधन असू नये.तसेच 'देणगीदारांच्या' दबावाखाली संपादक मंडळाने लिखाण निवडू नये.

**खर्च आणि ताळेबंद :**

अधिवेशन साधारणपणे तीन दिवसाचे असते. त्यांत पहिला दिवस व्यावसाईक संमेलन, प्रात्यक्षीके, चर्चासत्र आणि परिसंवाद यांत जातो.राहिलेल्या दोन दिवसांत भरमसाट कार्यक्रमांची खिचडी करणे योग्य नाही. याचा परिणाम फक्त सभासदांच्या गैरसोईचाच नव्हे तर लोकांकडून घेतलेल्या पैशाचा बेसुमार अपव्यय होतो.याची सर्व नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी मंडळाच्या नियोजकांची आणि पर्यायाने सर्व कार्यकारिणीची आहे.
हा बेजबाबदारपणा टाळण्यासाठी खालील निर्बंध कटाक्षाने पाळले गेले पाहिजेत.

१.**खजीनदाराची नेमणूक** : अधिवेशनाच्या कमिटीकडून खजीनदाराची नेमणूक न करता अशी नेमणूक बृहन महाराष्ट्र मंडळामार्फत केली गेली पाहिजे अशी तरतूद मध्यवर्ती घटनेत करावी व त्यासाठी खजीदाराची शैक्षणीक पात्रता व अनुभव याचे निकष ठरवावेत.
२. BMM कडून निवडल्या गेलेल्या खजीदाराने अधिवेशनाचे अंदाजपत्रक तयार करून प्रथम BMM कमिटीपुढे सादर करावे.

३. BMM कमिटीने मंजूर केल्यानंतर असे अंदाजपत्रक अधिवेशन कमिटीकडे पाठवावे.
४. खजीनदाराने त्रैमासिक हिशोब करून ताळेबंद तयार करावा.
५. पहिला तााळेबंद ३१ डिसेंबर २०१० ला तयार करून तो मंडळाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावा व त्यानंतर प्रत्येक त्रैमासिकाला ताळेबंद वेबसाईटवर प्रसिध्द केला गेला पाहिजे.
६. जुलै २०११ मध्ये होणाऱ्या अधिवेशनाचे अंदाजपत्रक मे अगर जून २०११ मध्ये होणाऱ्या अधिवेशनाच्या समितीपुढे ठेऊन मंजूरी घेणे.
७. खजीनदाराने अधिवेशनाच्या कार्यकर्त्यांकडून झालेल्या खर्चाची आंकडेवारी ठरावीक मुदतीत मागून घेणे.
३. जमा खर्चाचा ताळेबंद हिशोब ठरलेल्या मुदतींत कार्यकारिणीपुढे ठेवणे. ही मुदत अधिवेशनानंतर ५० दिवसापेक्षा जास्त नसावी व कार्यकारिणीने ताळेबंद हिशोब तपासून ऑडिटरकडे पाठविणे.
४. एक महिन्याचे आंत ऑडिटरकडून सहिशिक्का घेऊन सर्व कागदपत्रांसह नवीन कार्यकारिणीच्या हवाली करणे.
५. नवीन कार्यकारिणीने ताळेबंद हिशोब मंजूर केल्यानंतरच जुन्या कार्यकारिणीची जबाबदारी संपुष्टांत येईल.
६. सर्व ताळेबंद हिशोब सभासदांसाठी बृहन महाराष्ट्र वृत्तांत प्रसिध्द करणे.

पैशाचा योग्य विनियोग आणि चांगल्या कार्यक्रमांची निवड यावर अधिवेशनाचे यशापयश अवलंबून राहील. या साठी पैशाच्या विनियोगाची पारदर्शकता (Transperancy) आणि जबाबदारी (Accountability) यांचा संपूर्ण भार कार्यकारिणीवर राहील.

**सर्वात महात्वाचे म्हणजे फिलाडेल्फीयात झालेल्या अधिवेशनाचा खर्च–ताळेबंद सादर करताना प्रत्येक कार्यक्रमाला झालेला खर्च आणि कलाकाराला देलेली बिदागी-मानधन याची नांवानिशी यादी आणि तो कार्यक्रम कुणी ठरविला अथवा मागविला यांची नांवे कमिटीने जाहीर करण्याची मागणी आम्ही करीत आहोत.**

**BMM घटनेत बदल** : BMMच्या घटनेमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे असे आम्हाला वाटते. कालमानाप्रमाणे असे बदल अपिरीहार्य असतात. विशेषतः ही संस्था Non Profit Organization असल्यामुळे आणि स्थानिक कायदयांत बरेच फरक झाले असल्याकारणाने आपल्या घटनेत बदल करणे आव्श्यक आहे. त्यासाठीयेथील वकील अथवा चार्टर्ड अकाऊंटंट याची मदत घेणे अत्यावश्यक आहे आणि त्यासाठी नवीन कार्यकारिणीने एक समीती नेमावी अशी आम्ही शिफारस करीत आहोत.

मंडळी, आपल्या या विषयावर आणखी काही सूचना असल्यास आपण जरूर शिकागोच्या बी.एम.एम. कमीटीला कळवाव्यात.

“चलो शिकागोची” वाटचाल सुलभ करण्याचा हा एकच मार्ग आहे.

दिवाकर कारखानीस - ह्युस्टन (kdivakar22@yahoo.com)
रमेश आर प्रधान - न्यूजर्सी (rameshpradhan@hotmail.com)
डॉ. देवदत्त बेंद्रे फ्लॉरिडा (d.bendre@verizon.net)
विजय शेरतुकडे ... लुझियाना (vshertu@aol.com)
विजय पाठारे.. अरिझोना (vwpvwp@yahoo.com)

------------------------------